## निशाणी ८४ खालील आदेश

**( धनाजी कदम** वि. **सुरेश कदम )**

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीकरिता दाखल केलेला असुन वादीचे मते प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी नं.१६ हे ति–हाईत इसम म्हणुन दाव्यात हजर झालेले आहेत. त्यानंतर वादीने दावेचे कामी जादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तथापि दिनांक ०४.११.२००६ रोजीचे खरेदीपत्रामधील मजकुर पहाता दावेचे कामी दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे कथन करुन वादीने खरेदीपत्राअनुषंगे आवश्यक असणारा मजकुर नमुद करणेस परवानगी मागीतलेली आहें.

२. प्रस्तुत अर्जास निशाणी ८६ सोबत प्रतिवादी नं.१६ यांनी म्हणणे सादर केलेले असुन त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये वादी यास खरेदीपत्राबाबत पूर्ण माहिती असताना देखील प्रतिवादी न.१६ यास जाणीवपुर्वक प्रस्तुत दावेचे कामी पक्षकार केलेले नव्हते. वादीने अर्जास दिलेले कारण हे चुकीचे व न्यायालयाची दिशाभूल करणारे आहे असे कथन करुन वादीचा अर्ज नामंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत कामी वादी व प्रतिवादी नं.१६ तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे विधिज्ञ श्री. पी. एस. पाटील यांनी निशाणी ८८ लगत असणा–या फेरिस्तने "**Dhanapal Appanna Phakire V/s.**

**Malutai and others**, of Hon'ble Karnataka Dharwad High Court, decided on 02.06.2015” हा न्यायनिर्णय तसेच प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एम. एम. मुजावर यांनी [1] “**Vinod Kumar V/s. All India Blind Relief Society (REGD.) And Others**, of Hon'ble Dilhi High Court, decided on 04.09.2013” & [2] **Chander Kanta Bansal V/s. Rajinder Singh Anand**, of Hon'ble Supreme Court, decided on 11.03.2008” याप्रमाणे आपापले कथनास दुजोरा देणारे न्यायनिर्णय हजर केले.

४. वरील सर्व न्यायनिर्णयांचे वाचन करता, सर्व न्यायनिर्णयामध्ये पारीत केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार ''वादीस दावा चौकशीकरता नेमलेनंतर देखील वादीने सर्वतोपरी व्यासंग (due diligence) घेवुन देखील एखादी बाब दाव्याचे कथनांमध्ये नमुद करता आली नाही ही बाब न्यायालयास समाधानकारकरित्या निदर्शनास आणुन दिलेस या न्यायालयास वादीचा दुरुस्ती अर्ज मंजुर करता येईल'' असे स्पष्ट मत व्यक्त केलेचे दिसुन येते.

५. प्रस्तुतचा दावा हा मुलतः वादीने प्रतिवादी नं.१ ते १४ यांचेविरुध्द् वाटपाकरता तसेच अलग व पृथक कब्जा मिळणेकरता दाखल केलेला आहे. तद्नंतर दिनांक २१.०३.२०१७ रोजी प्रतिवादी नं.१६ यांनी निशाणी ६६ सोबत अर्ज देवुन दावेचे कामी पक्षकार म्हणुन समाविष्ट करणेकरिता विनंती केलेली होती. सदरचा अर्ज दिनांक ०६.१०.२०१७ रोजी मंजुर करणेत आलेला असुन त्या अनुषंगे प्रतिवादी नं.१६ यांनी या दावेचे कामी

दिनांक ०६.०२.२०१८ रोजी कैफियत दाखल केलेली आहे.

६. प्रस्तुत दावेचे कामी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांनी प्रतिवादी नं.१६ यांनी पक्षकार करणेपुर्वी म्हणजेच दिनांक २४.०२.२०१७ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असुन तद्नंतर दिनांक २०.०६.२०१८ रोजी जादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. दिनांक ०७.०७.२०१८ रोजी प्रतिवादी नं.१६ यांचेवतीने वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा अंशतः उलटतपास नोंदवणेत आलेला असुन तद्नंतर वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. आजमितीस प्रस्तुतचा दावा हा वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उर्वरित उलटतपास नोंदवणेकरता नेमणेत आलेला आहे.

७. प्रस्तुत दावा अर्जाचे वाचन करता, वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी नं.१ ते १५ यांचेविरुध्द् दाखल केलेला असुन त्यांचे मालकी व वहिवाटीच्या वडिलार्जित मिळकतींचे वाटप व कब्जा मिळणेकरता वादीने विनंती केलेली आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी नं.१६ हा दावा मिळकत गट नं.५२५ व ५२६ या मिळकतींचा खरेदीदार या नात्याने दावेचे कामी हजर झालेला आहे. प्रस्तुत कामी वादीने प्रतिवादी नं.१६ याचेविरुध्द् कोणतीही दाद मागीतल्याचे दिसुन येत नाही. उलटपरत्वे दावा दाखल झालेनंतर प्रतिवादी नं.१६ दावेचे कामी हजर होवुन वादीचा दावा नामंजुर करणेबाबत विनंती करीत आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी नं.१६ दावेचे कामी हजर होणेपुर्वी वादीने मुळ सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे व त्या अनुषंगे दिनांक २०.०६.२०१८ रोजी

जादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

८. अभिलेखावर हजर केलेला निशाणी ८३ सोबतचा न्यायनिर्णय विचारात घेता, वादी व प्रतिवादी नं.१६ यांचे दरम्यान अन्य वाद प्रलंबीत असल्याचे दिसुन येते. तसेच वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा अशंतः नोंदवणेत आलेला उलटतपास विचारात घेता, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान यापुर्वी रे.दि.मु.नं.३०३/२००६ (नविन नंबर रे.दि.मु.नं.२५२/२००८) हा दावा दाखल होता हे वादी मान्य करत आहे. कांही क्षणाकरिता वादी यांस प्रतिवादी याचे गट नंबर ५२५ व ५२६ या मिळकतीमधील दिनांक ०४.११.२००६ रोजीचे खरेदी दस्ताबाबत पुर्वी माहिती होती असे गृहीत धरले तरी वादी याने मुलतः प्रतिवादी नं.१६ यांचेविरुध्द् कोणतीही दाद मागीतलेली नसुन वादी हा केवळ त्याचे कुटुंबातील लोकांविरुध्द् दाद मागत आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीने प्रतिवादीचे दिनांक ०४.११.२००६ रोजीचे खरेदीपत्राबाबतचा मजकुर दावेचे कामी नमुद करणे आवश्यक होता असे म्हणता येणार नाही. प्रस्तुत कामी प्रतिवादी नं.१६ हा स्वतःहुन या दावेचे कामी हजर होत असुन वादीचा दावा नामंजुर करणेबाबत विनंती करत आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी यास प्रतिवादी नं.१६ याचेसोबत दावा मिळकतीमधील क्षेत्राबाबत झालेल्या व्यवहाराची पूर्ण माहिती देणेची गरज ही प्रतिवादी नं.१६ हा दावेचे कामी हजर झालेनंतरच निर्माण झालेली आहे. प्रस्तुत कामी आजमितीस वादीतर्फे साक्षीदार क्र.१ याचा अंशतः उलटतपास नोंदवणेत आलेला असुन त्यातील मजकुर विचारात घेता, वादी मागत असलेली प्रस्तावित दुरुस्ती ही वादीतर्फे साक्षीदार

क्र.१ याचे उलटतपासातील कथनास बाधा आणणारी अशी असल्याचे दिसुन येत नाही. याउलट प्रस्तावित दुरुस्ती अनुषंगे वादी हा दावा मिळकत व प्रतिवादी नं.१६ याचा दावा मिळकतीशी असणा–या हक्कसंबंधाबाबत सविस्तर माहिती न्यायालयासमक्ष कथन करु इच्छीत असल्याचे दिसुन येते. वादी मागत असलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ दावेचे कथनांचे स्वरुप बदलणारी अशी दिसुन येत नाही.

**९.** वादीचा प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजुर केलेस वादी व प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसुन याउलट त्यांचे दरम्यानचे वाद हे एकाचवेळी निर्णयीत होणार आहेत. तसेच वादीतर्फे हजर करणेत आलेल्या न्यायनिर्णयाअनुषंगे वादीचा प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजुर केलेस प्रतिवादी नं.१६ यास जादा कैफियत देण्याची मुभा असणार आहे. सबब प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**१०.** प्रस्तुत कामी वादीने प्रतिवादी नं.१६ यांची कैफियत सादर केल्यानंतर प्रस्तुतची प्रस्तावित दुरुस्तीची मागणी करणे अपेक्षीत असुन निश्चितपणे वादीने सदर दुरुस्ती मागणेस विलंब केलेला असलेमुळे वादीचा अर्ज मंजुर करतेवेळी वादीने प्रतिवादी नं.१६ यास दंड रक्कम देणेबाबत आदेश करणे मला न्यायोचीत वाटत आहे. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज वादीने प्रतिवादी नं.१६ यास दंड रक्कम

रु.५००/– देणेच्या अटीवर मंजुर करणेत येत आहे.

**२.** सदर आदेशापासुन वादीने १४ दिवसांचे आत दावेमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करणेची असुन तात्काळ दावा दुरुस्ती प्रत हजर करणेची आहे.

**सही /–**

**दिनांक ०३.०९.२०१८.** **( श्रीमती. दुर्गा भ. सुतार )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**कडेगांव.**